# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्रशासनाचा उपक्रम)

## जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई-४०० ००४.

समग्र शिक्षा या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई कार्यालयात खालील पदासाठी बाल विकास व प्रकल्प अधिकारी / गट शिक्षणाधिकारी/ उपशिक्षणाधिकारी, तहसीलदार, कक्ष अधिकारी, नायब तहसीलदार, कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता या संवर्गातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सेवा करार पद्धतीने नियुक्तीसाठी पात्र व योग्य सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| क्र. | पदनाम | कामाचे स्वरुप | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ प्रकल्प समन्वयक (गुणवत्ता व प्रशिक्षण) | शैक्षणिक गुणवत्ता | ०१ |
| २. | कार्यक्रम समन्वयक (पायाभूत सुविधा व टिकवणूक) | पी. एम. श्री योजना | ०१ |
| ३. | कार्यक्रम समन्वयक (MIS & ICT) | विद्या समिक्षा केंद्र | ०१ |
| ४. | कार्यक्रम समन्वयक (नियोजन व संनियंत्रण) | प्रशासकीय कामकाज | ०१ |
| ५. | कार्यक्रम समन्वयक (व्यवसाय शिक्षण) | व्यवसाय शिक्षण | ०१ |
| ६. | कार्यक्रम सहाय्यक | उपक्रम (समग्र शिक्षा) | ०१ |
| ७. | कार्यकारी अभियंता (पी. एम. श्री) | बांधकाम | ०१ |
| **एकूण** | | | **७** |

**वयोमर्यादा :**

१) उपरोक्त क्र. १ ते ६ वर नमूद पदासाठी सेवानिवृत्त अधिकारी हे शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले असावेत.

२) करारपद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

३) नियुक्ती देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांचे कार्यालय महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई हे राहील.

४) उपरोक्त क्र. १ वर नमूद पदांकरिता बाल विकास व प्रकल्प अधिकारी या संवर्गातून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

५) उपरोक्त क्र. २ ते ४ वर नमूद पदांकरिता उपशिक्षणाधिकारी / गटशिक्षणाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार या संवर्गातून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या प्राधान्याने विचार करण्यात येईल.

६) उपरोक्त क्र. ५ वर नमूद कार्यक्रम समन्वयक (व्यवसाय शिक्षण) या पदाकरिता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

७) उपरोक्त क्र. ६ वर नमूद पदांकरिता अधीक्षक (सामान्य राज्य सेवा), नायब तहसिलदार या संवर्गातून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

८) उपरोक्त क्र. ७ वर नमूद पदाकरीता सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता / उपकार्यकारी अभियंता या संवर्गातील अधिकाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

**मासिक पारिश्रमिक :**
सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ व सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १४/०७/२०२१ मध्ये देण्यात आलेल्या परिगणनेनुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते अनुज्ञेय राहतील.

**नियुक्तीचे स्वरूप :** करारपद्धतीने सेवा राहील. निवड झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची प्रथम एकवर्षासाठी (सहा-सहा महिन्या करिता) एकत्रित मासिक पारिश्रमिकावर करारपद्धतीने नियुक्ती करण्यात येईल. तसेच कामाचे स्वरूप व व्याप्ती ठरवून देण्यात येईल. त्यांचा करार कालावधी समग्र शिक्षा प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार व कामकाज समाधानकारक असल्यास वेळोवेळी वाढविण्यात येईल.

सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी विहीत नमुन्यात अनुभव व प्रमाणपत्राच्या प्रती जोडून राज्य प्रकल्प संचालकयांच्या नावे वरील पत्त्यावर अर्ज दिनांक ३०/११/२०२२ संध्याकाळी ५.००पर्यंत सादर करावेत. दिनांक ३०/११/२०२२ संध्याकाळी ५.००नंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

सदर जाहिरातीची प्रक्रिया कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार मा. राज्य प्रकल्प संचालक यांनी राखून ठेवले आहेत.

स्वाक्षरीत/-
राज्य प्रकल्प संचालक,
म.प्रा.शि.प., मुंबई.